# मिरा भाईंदर महानगरपालिका

## परिवहन उपक्रम

स्व. इंदिरागांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.) ता.जि.ठाणे. 401101. दूरध्वनी क्र. 2189 2828.

जा.क्र.मनपा/परि/ ६९ /2021-22 दिनांक :- ३१/०५/२०२१

प्रति,
सहा. आयुक्त (सा.प्र.)
मिरा भाईंदर महानगरपालिका.

**विषय** :- केंद्र शासनाचा माहिती अधिकार अधिनियम 2005 अंतर्गत माहिती मिळण्याबाबत.

**संदर्भ** :- आपलेकडील जा.क्र.मनपा/सा.प्र./97/2021-22 दि.25/05/2021 रोजीचे पत्र.

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयांन्वये या विभागाची माहिती निरंक आहे.

(मंजिरी डिमेलो)
जनमाहिती अधिकारी तथा
परिवहन उप-व्यवस्थापक
परिवहन उपक्रम
मिरा भाईंदर महानगरपालिका

Received on 01/06/21

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.),
ता. जि. ठाणे - ४०१ १०१, दुरध्वनी क्र. : २८१९ २८२८.

## ।। सामान्य प्रशासन विभाग।।

जा.क्र.मनपा/सा.प्र./ ९८ /२०२१ - २२ दि. 24 / 05 /२०२१

प्रति,

जनमाहिती अधिकारी / सहाय्यक जनमाहिती अधिकारी तथा

1.उप-अभियंता, सार्व.बांधकाम विभाग,

2.उप-अभियंता, पाणी पुरवठा विभाग,

3.सहा. लेखापरिक्षण, लेखा परिक्षण विभाग

4.लिपीक, लेखा विभाग,

5.लिपीक, भांडार विभाग,

6.लिपीक, वैदयकीय आरोग्य विभाग,

7.लिपीक, संगणक विभाग,

8.लिपीक, परिवहन उपक्रम विभाग,

9.लिपीक, उदयान व वृक्षप्राधिकरण विभाग.

विषय :- केंद्र शासनाचा माहिती अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत माहीती मिळण्याबाबत.

संदर्भ :- 1. श्री. रमारमण व्यंकटेश कोंतम यांच्याकडील दि.05/04/2021 रोजीचा अर्ज

2.नगर विकास विभाग यांच्याकडील क्रमांक : केंमाअ-2021/प्र.क्र.110/नवि-33, दि.19 मे, 2021 रोजीचे पत्र

विषयंकित प्रकरणी संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, संदर्भिय पत्रातील विषय हा आपल्या विभागाशी संबंधित असल्यामुळे माहिती अधिकार अधिनियम, 2005 मधील कलम 6 (3) अन्वये संदर्भिय पत्र पुढील कार्यवाहीसाठी आपल्या विभागास वर्ग करण्यात येत आहे. यासंदर्भात दि. 24 मे, 2021 रोजी ई-मेल केलेला आहे. तरी संबंधितांस परस्पर माहीती देण्यात यावी, व त्यांची एक प्रत सामान्य प्रशासन विभागांकडे देण्यात यावी.

सोबत :- संदर्भिय पत्र जोडले आहे.

श्री. नाईक
त्वरीत कार्यवाही
करावी.
29/5/21

24/05/2021

(अविनाश जाधव)
जनमाहिती अधिकारी तथा
सहा. आयुक्त (सा.प्र.)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत माहितीस्तव :-
श्री. रमारमण व्यंकटेश कोंतम
ब्लॉक नं.बी-1/11/1/54 ब भवानी पेठ,
होमकार नगर सोलापूर-413002

परिवहन उपक्रम
आवक क्र. 920
दिनांक : 28/05/21

# छोट्या कंत्राटदारांचे अडकले आठ हजार कोटी

## अडीच लाख जण हवालदिल; आंदोलनाचा इशारा

Gurubal.Mali
@timesgroup.com

कोल्हापूर : पाठपुरावा करूनही राज्य सरकारकडे किरकोळ कंत्राटदारांची तब्बल आठ हजार कोटी रुपयांची देयके थकली आहेत. यामुळे अडीच लाख कंत्राटदार हवालदिल झाले असून, ते आता आंदोलनाच्या पवित्र्यात आहेत. पंधरा दिवसांत बिले न दिल्यास राज्यातील सर्व कामे बंद पाडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

नवीन रस्ते, रस्ते दुरुस्ती, सरकारी इमारती, तलाव यासह अनेक कामे हे किरकोळ कंत्राटदार करतात. गेल्या चार-पाच वर्षांत या कंत्राटदारांना टाळून बहुतांश कामे मोठ्या कंत्राटदारांना देण्यात येत आहेत. त्यामुळे आधीच अडचणीत आलेले हे कंत्राटदार बिले थकल्याने जेरीस आले आहेत. जलसंधारण, ग्रामविकास, नगरविकास, सार्वजनिक बांधकाम विभाग आदी विभागांकडे मोठ्या प्रमाणावर बिले थकली आहेत.

> “ सरकार अनेक वर्षांपासून किरकोळ कंत्राटदारांवर अन्याय करीत आहे. मोठ्या कंत्राटदारांना वेगळा न्याय लावून त्यांना सवलती द्यायच्या आणि किरकोळ कंत्राटदारांना त्रास द्यायचा, हा उद्योग बंद करावा. थकीत देयके तातडीने द्यावीत, अन्यथा राज्यभर आंदोलन केले जाईल.
>
> – मिलिंद भोसले, महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ व राज्य अभियंता संघटना

| विभाग | थकलेली बिले (रुपयात) |
|---|---|
| सार्वजनिक बांधकाम | ३४०० कोटी |
| [illegible] | [illegible] |
| जलसंधारण विभाग | २०० कोटी |
| ग्रामविकास विभाग | ८५० कोटी |



मटा विशेष

सध्या सरकारकडे तब्बल आठ हजार कोटी रुपयांची बिले थकीत आहेत. पाठपुरावा केल्यानंतर एकूण बिलाच्या केवळ पाच ते दहा टक्के रक्कम दिली जाते. ही रक्कम अतिशय तुटपुंजी असल्याने कंत्राटदारांच्या अडचणी वाढल्या आहेत.

महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ व राज्य अभियंता संघटनेने शुक्रवारी सरकारबरोबर चर्चा केली; पण, पदरात काहीच न पडल्याने आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. याचाच एक भाग म्हणून तीन मे रोजी भीक मागो आंदोलन करण्यात येणार आहे.